**ठळक बातम्या**

- क्रोएशियाच्या दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशी रवाना

- ऑपरेशन सिंधू मोहिमेअंतर्गत इराणमधून ११० विद्यार्थ्यांना घेऊन आलेलं विमान नवी दिल्लीत दाखल

- QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान

**आणि**

- ख्यातनाम वन्यजीव अभ्यासक मारुती चितमपल्ली यांचं निधन

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला पाच दिवसांचा परदेश दौरा पूर्ण करून आज क्रोएशिया इथून मायदेशी परत यायला निघाले. प्रधानमंत्री मोदी यांचा क्रोएशियाचा हा पहिलाच दौरा होता. त्यांच्या या दौऱ्यात झालेल्या उच्चस्तरीय भेटींनी दोन्ही देशांमधल्या भविष्यातल्या धोरणात्मक सहकार्याचा मार्ग मोकळा केला.

प्रधानमंत्री मोदी यांनी क्रोएशियाचे प्रधानमंत्री आंद्रेज प्लेन्कोविच यांच्याशी प्रतिनिधीमंडळ पातळीवर चर्चा केली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात जागतिक शांतता, लोकशाही मूल्य, व्यापार, तंत्रज्ञान आणि परस्परांच्या संस्कृतीमध्ये सहकार्य वाढवण्याप्रति सामायिक वचनबद्धतेवर भर दिला. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय व्यापार अधिक दृढ करण्यावर आणि लवचिक, विश्वासार्ह पुरवठा साखळी तयार करण्यावरही सहमती दर्शवली. परस्पर संबंध आणखी मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठं पाऊल म्हणून, दोन्ही देशांनी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा क्रोएशियाचा ऐतिहासिक दौरा मैत्री, सहकार्य आणि सामायिक जागतिक दृष्टिकोनाचा मजबूत संदेश देऊन यशस्वीपणे संपन्न झाला.

**<><><><>**

ऑपरेशन सिंधू मोहिमेअंतर्गत उत्तर इराणमधून ११० विद्यार्थ्यांना घेऊन आलेलं विमान आज पहाटे नवी दिल्लीत दाखल झालं. इस्रायल आणि इराणमध्ये वाढत असलेल्या

संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतानं आपल्या नागरिकांना इराणमधून परत आणण्यासाठी ऑपरेशन सिंधू ही मोहीम आखली आहे. पहिल्या टप्प्यात ११० विद्यार्थ्यांना इराणमधून येरेवान या अर्मेनियाच्या राजधानीत आणण्यात आलं आणि तिथून काल दुपारी विमानानं विद्यार्थी भारताकडे परत आले. भारत इराण आणि अर्मेनिया सरकारचा ऋणी असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान, इराणमधल्या भारतीय नागरिकांनी तेहरानमधील दूतावासाच्या संपर्कात राहावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><>**

गुजरात, केरळ, पश्चिम बंगाल आणि पंजाबमध्ये लुधियाना या चार राज्यांतील पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणुकीसाठी आज मतदान होत आहे.

आज सकाळी ११ वाजेपर्यंत गुजरातच्या विसावदर इथं २८ टक्के, तर कडी इथं २४ टक्के मतदान झालं आहे. केरळच्या नीलांबुर इथं ३० टक्क्यांहून अधिक तर पंजाबच्या लुधियाना विधानसभेच्या जागेसाठी २१ टक्क्यांहून अधिक मतदान झालं आहे. पश्चिम बंगालच्या कालीगंज विधानसभेच्या जागेसाठी ३१ टक्के मतदान झालं आहे. या पाचही ठिकाणची मतमोजणी सोमवारी होणार आहे.

**<><><><>**

आर्थिक गैरव्यहार केल्याप्रकरणी ओदिशातले बिजू जनता दलाचे ज्येष्ठ  दिवंगत नेते नबाकिशोर दास यांच्याशी संबंधित असलेल्या २० मालमत्तांवर आयकर विभागानं एकाच वेळी आज छापे टाकले. झारसुगुडा, संबलपूर आणि नवी दिल्लीत असलेल्या मालमत्तांवर एकाच वेळी हे छापे टाकण्यात आले आहेत.

दास यांच्या कार्यकाळात कोळसा आणि राख वाहतूक व्यवहारांमध्ये झालेली आर्थिक अनियमितता, करचुकवेगिरी आणि दास यांनी बेहिशोबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी कारवाई करण्यात केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**<><><><>**

नीट एमबीबीएस प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी बिहारमध्ये पाटणा, झारखंडमध्ये रांची आणि इतर काही ठिकाणी सक्तवसुली संचालनालयानं आज छापे टाकले. प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणातील मुख्य सूत्रधार संजीव मुखिया आणि त्याच्याशी

संबंधित इतर व्यक्तींच्या ठिकाणी ही छापेमारी सुरू असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

<><><><>

QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान मिळालं आहे. यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी-IIT दिल्ली या शैक्षणिक संस्थेनं १२३ वा क्रमांक मिळवला आहे. या संस्थेला आजवर मिळालेली सर्वोच्च QS जागतिक क्रमवारी आहे. या आधी ही संस्था १५० व्या स्थानी होती.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधून ५४ भारतीय शिक्षण संस्थांनी QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्थान मिळवल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. २०१४ मध्ये केवळ ११ भारतीय विद्यापीठांना QS क्रमवारीत स्थान होतं आता या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या शैक्षणिक सुधारणांचं फलित असल्याचं प्रधान यांनी नमूद केलं.

देशाचं राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० केवळ भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेत क्रांतिकारी सुधारणा घडवत असल्याचंही प्रधान यांनी या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

ख्यातनाम वन्य जीव अभ्यासक, पद्मश्री पुरस्कार प्राप्त मारुती चितमपल्ली यांचं काल संध्याकाळी सोलापूरमध्ये वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. जंगल आणि वन्य प्राण्यांवर प्रेम करणारे चितमपल्ली यांना ‘अरण्यऋषी’ म्हणून ओळखलं जातं.

चितमपल्ली यांनी महाराष्ट्र सरकारच्या वन विभागात ३६ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा केली. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यासारख्या विविध जंगलांमध्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये त्यांनी काम केलं. वन्यजीव संरक्षणात त्यांनी मोठं योगदान दिलं. नागझिरा आणि मेळघाट इथल्या विस्थापित वन्यजीवांसाठी अनाथाश्रम उभारायला त्यांनी मदत केली.

मारुती चित्तमपल्ली यांचं साहित्य मुख्यतः मराठी भाषेत असून ते वन्यजीव, निसर्ग आणि आदिवासी जीवनावर केंद्रित आहे. पक्षीविज्ञान आणि वन्यजीवनाशी संबंधित अनेक नवीन शब्द आणि संज्ञा त्यांनी मराठी भाषेत आणल्या. अनेक पक्षी-शास्त्रीय संकल्पनांना त्यांनी मराठी नावं दिली. "चकवा चांदणं" ही त्यांची आत्मकथा प्रसिद्ध आहे. त्याशिवाय,

निलवंती, जंगलाचं देणं, रातवा, रानवाटा, केशराचा पाऊस, सुवर्ण गरुड या काही त्यांच्या लोकप्रिय साहित्यकृती आहेत.

२००६ साली सोलापूर इथं झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. चितमपल्ली यांना २०१७ मध्ये, महाराष्ट्र सरकारने विंदा करंदीकर स्मृती जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित केलं. जानेवारी २०२५ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित केलं. त्यांच्या पार्थिवावर आज सोलापूर इथं अंत्यसंस्कार होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी चितमपल्ली यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><>**

इराण आणि इस्रायल यांच्यातला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. इस्रायलनं इराणवर काल आणखी तीन टप्प्यांमध्ये हल्ले केले. त्यामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या वाढल्याचं इराणनं म्हटलं आहे. इस्रायलनं इराणच्या राष्ट्रीय पोलिसांचं मुख्यालयावर हल्ला केल्यानं अनेक जण जखमी झाले आहेत. तेहरानमधल्या रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रकल्पासह चाळीस ठिकाणीही हल्ले करण्यात आले. सततच्या बॉंबहल्ल्यांमुळं तेहरान आणि इतर शहरांमध्ये घबराट पसरली आहे. आत्तापर्यंत सुमारे ५८५ जणांचा मृत्यू झाला, तर तेराशे जण जखमी झाल्याचं इराणचे अधिकारी आणि मानवी हक्क संघटनांचं म्हणणं आहे. दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांनी आंतरराष्ट्रीय दबावाला बळी पडणार नसल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी या भागात लष्करी तैनातीत वाढ केली आहे आणि इराणनं बिनशर्त शरण यावं अशी मागणी केली आहे.

**<><><><>**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी पुन्हा एकदा इस्राएल आणि इराण दरम्यानचा संघर्ष तात्काळ थांबवण्याचं आणि युद्धबंदी लागू करण्याचं आवाहन केलं आहे. इस्राएल-इराण दरम्यानच्या वाढत्या तणावाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे आणि या समस्येचं आंतरराष्ट्रीयीकरण करू नये, असंही आवाहन केलं आहे.

कोणताही अतिरिक्त लष्करी हस्तक्षेप हा संपूर्ण प्रदेश आणि आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेवर गंभीर परिमाण करू शकतो, असं त्यांनी म्हटलं आहे. या संघर्षामुळे होत असलेल्या मनुष्यहानीबद्दल त्यांनी निषेध नोंदवला असून, केवळ राजनैतिक पातळीवरच हा प्रश्न सोडवता येईल, असं गुटेरस यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

तामिळनाडूच्या तिरुपूर इथून आज २६ बांग्लादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. पल्लदम इथं काही नागरिक बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्यानंतर त्यांच्या घरांवर छापा घातला असता, बनावट कागदपत्रे, आधार कार्ड आढळून आले. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

**<><><><>**

पुण्याजवळ जेजुरी-मोरगाव रस्त्यावर काल संध्याकाळी टेम्पो आणि चारचाकी गाडीच्या अपघातात ८ जणांचा मृत्यू तर पाच जण जखमी झाले. जखमींना जेजुरीच्या सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं. या अपघाताबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे, तर जखमींना ५० हजार रुपये दिले जातील, अशी घोषणा केली आहे.

**<><><><>**

झारखंड, गुजरात, केरळ, पश्चिम बंगालचा डोंगराळ प्रदेश, उत्तराखंड, मध्यप्रदेश आणि ईशान्येकडच्या राज्यांमध्ये आज जोरदार पाऊस पडेल, तर आंध्रप्रदेश, तामिळनाडू, पुडुचेरी आणि करैकलमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहील असा असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><>//**